**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**मंगळवार दिनांक ०२ जून २०२६**

**ठळक बातम्या**

1. **'लाडकी बहीण' योजनेत अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांकडून पैसे परत घेणार नाही असं मुख्यमंत्र्यांचं स्पष्टीकरण.**

2. **मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या तिसऱ्या टप्प्यातील कामांसाठी आशियाई बँकेच्या ५०० दशलक्ष डॉलर्स कर्ज प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी.**

3. **खामगाव-जालना नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्ग प्रकल्पासाठी भूमी अधिग्रहणाची अधिसूचना केंद्र सरकारच्या राजपत्रात प्रसिद्‌ध.**
   **आणि**

4. **मराठा आरक्षण आंदोलनात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसांना औद्‌योगिक विकास महामंडळात अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणार.**

**आता सविस्तर बातम्या .......**

लाडकी बहीण

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून वगळले गेलेल्या लाभार्थी कागदपत्रं सादर करू शकल्या नाहीत, संपूर्ण छाननी केल्यानंतरच त्यांना अपात्र ठरवलं आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. लाडकी बहीण योजनेची सुरुवात झाली तेव्हा कागदपत्रं सादर करायला उशीर लागेल म्हणून लाभार्थ्यांनी स्वतः दिलेली माहिती गृहित धरून लाभ दिला गेला होता. मात्र त्यानंतर या योजनेचं ऑडिट झाल्यावर लाभार्थ्यांपैकी पाच लाख जणींच्या कुटुंबात सरकारी नोकरी असल्याचं उघड झालं, तसंच दहा लाख जणींचं उत्पन्न अडीच लाखापेक्षा जास्त असल्याचं समोर आलं, त्यामुळे त्या सर्व लाभार्थी अपात्र ठरल्या. तसंच १४ हजार पुरुषांनी या योजनेसाठी अर्ज केले होते त्यांनाही अपात्र ठरवण्यात आलं, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना केवायसी करायला सांगण्यात आलं, ज्यांनी केवायसी केलं अशा एक कोटी ७० लाख महिला योजनेसाठी पात्र ठरल्या आहेत, बाकी सर्व अपात्र ठरल्या असं मुख्यमंत्र्यांनी

सांगितलं. जे लाभार्थी अपात्र ठरले त्यांना आता पैसे दिले जाणार नाहीत, मात्र आतापर्यंत मिळालेले पैसे परत घेतले जाणार नाहीत असंही त्यांनी सांगितलं.

मंत्रिमंडळ निर्णय

मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-३ मधील कामांसाठी आशियाई इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँकेच्या ५०० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स कर्जास तसेच राज्य निधीच्या प्रस्तावास आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र राज्य रस्ते सुधारणा प्रकल्पाला आशियाई पायाभूत गुंतवणूक बँक आणि न्यू डेव्हलपमेंट बँकेकडून प्रत्येकी ८ हजार ७०० कोटी रुपयांचे अर्थसहाय्य मिळणार असल्याने राज्यातील रस्ते सुधारणा आणि विकासाला आणखी गती मिळणार आहे.

नवीन ब्रॉडगेज रेल्वे

बुलढाणा जिल्ह्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या खामगाव-जालना नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्ग प्रकल्पासाठी भूमी अधिग्रहणाची अधिसूचना केंद्र सरकारच्या राजपत्रात प्रसिद्ध झाली आहे. केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री खासदार प्रतापराव जाधव यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या प्रकल्पाला गती मिळाली असून त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले आहेत. रेल्वे (सुधारणा) अधिनियम 2008 अंतर्गत जालना-खामगाव दरम्यानचा 162 किलोमीटर लांबीचा नवीन रेल्वे मार्ग 'विशेष रेल्वे प्रकल्प' म्हणून अधिसूचित करण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक निधीपैकी 50 टक्के हिस्सा महाराष्ट्र शासनाने स्वीकारला असून त्याची तरतूद राज्याच्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. मध्य आणि सेंट्रल रेल्वेला जोडणारा हा महत्वाकांक्षी रेल्वे मार्ग बुलढाणा जिल्ह्याच्या औद्योगिक, व्यापारी आणि सामाजिक विकासाला चालना देणारा ठरणार आहे.

सीबीएसई

सीबीएसई, अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने उपलब्ध केलेल्या उत्तरपत्रिकांच्या 'स्कॅन्ड' (scanned) प्रतींमधल्या त्रुटींच्या पडताळणीसाठी, तसंच उत्तरांच्या पुनर्मुल्यांकनासाठीचं पोर्टल आजपासून कार्यान्वित झाल्याचं सीबीएसई नं जाहीर केलं आहे. हे पोर्टल येत्या ६ जून पर्यंत खुलं राहील, मात्र ज्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या तपासलेल्या उत्तरपत्रिकांची स्कॅन केलेली प्रत मिळवली आहे, त्यांनाच या

सुविधेचा लाभ घेता येईल, असं सीबीएसई नं आपल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. सुरक्षेच्या कारणासाठी यामध्ये आधार पडताळणीचा समावेश करण्यात आला असून, ज्या विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नाही, त्यांना आपले पालक अथवा नातेवाईकांचे आधार तपशील वापरता येतील.

आंदोलन

देशातील वाढती महागाई, बेरोजगारी आणि बिघडत चाललेल्या आर्थिक परिस्थितीच्या निषेधार्थ भारतीय कम्युनिस्ट पक्ष (सीपीआय), मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (सीपीएम) आणि फॉरवर्ड ब्लॉक यांच्या संयुक्त विद्यमाने आज नागपूरातील व्हरायटी चौक येथे निदर्शने करण्यात आली.या आंदोलनाचे नेतृत्व भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव डॉ. युगल रायलू आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव कॉ. अरुण लाटकर यांनी केले. यावेळी आंदोलकांनी केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणांवर टीका करत वाढती महागाई नियंत्रणात आणावी, बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात तसेच सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देणारे निर्णय तातडीने घ्यावेत, अशी मागणी केली.

जनसंपर्क कार्यालय

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचे खामला चौक, देवनगर येथील जनसंपर्क कार्यालय उद्या ३ जून पासून महाल इथल्या गडकरीवाडा इथं स्थलांतरित करण्यात येत आहे. यापुढील सर्व जनसंपर्क आणि नागरिकांच्या भेटीगाठींसाठी हे कार्यालय महाल येथील गडकरी वाडा इथं कार्यरत राहणार आहे.

अनुकंपा तत्वावर नोकरी

मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मृत्यूमुखी पडलेल्या आंदोलकांच्या वारसांना आता औद्योगिक विकास महामंडळ अर्थात एमआयडीसीतही अनुकंपा तत्वावर नोकरी दिली जाणार आहे. त्यानुसार राज्यातल्या सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आपापल्या जिल्ह्यातल्या मृत आंदोलकांच्या वारसांची तातडीने पडताळणी करून प्रमाणपत्र वितरीत करण्याचे आदेश सामान्य प्रशासन विभागन दिले आहेत. राज्य सरकारच्या वतीने मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी अलीकडेच मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणावेळी आंदोलकांच्या वारसाना एसटीप्रमाणे एमआयडीसीतही नोकरीचं आश्वासन दिलं होतं.

‘लालपरी गौरवरत्न पुरस्कार’

अमरावती जिल्ह्यातील बस स्थानकांनी राज्यस्तरीय ‘हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ आणि सुंदर बसस्थानक’ स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळविले आहे. ब गटात परतवाडा बसस्थानकाने प्रथम, मोर्शीने द्‌वितीय तर चांदूर बाजारने तृतीय क्रमांक पटकावला असून, क गटात अंजनगाव सुर्जी बसस्थानकाला द्‌वितीय क्रमांक मिळाला आहे. एसटी महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त अमरावती प्रादेशिक कार्यालयात आयोजित कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा तसेच १२ कर्मचाऱ्यांना ‘लालपरी गौरवरत्न पुरस्कार’ देऊन गौरव करण्यात आला. तसंच २५ वर्षांहून अधिक काळ अपघातविरहित सेवा बजावणाऱ्या सहा चालकांचा सत्कार करण्यात आला, तर एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत सलग २६० दिवस अपघातमुक्त सेवा देणाऱ्या सात चालकांनाही गौरविण्यात आलं.

असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट

नागपूरच्या असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट तर्फे जीएमआर विमानतळ प्रकरण मार्गी लावण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबद्‌दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा नागपुरातील रामगिरी इथं सत्कार करण्यात आला. एआयडीच्या शिष्टमंडळाने केंद्र सरकारकडून प्रकल्पाला मंजुरी मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी केलेल्या पाठपुराव्याबद्‌दल कृतज्ञता व्यक्त केली. या निर्णयामुळे नागपूरचे विमानवाहतूक, लॉजिस्टिक्स आणि गुंतवणूक केंद्र म्हणून स्थान अधिक बळकट होईल तसेच विदर्भातील औद्‌योगिक विकास आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळेल, असा विश्वास एआयडीने यावेळी व्यक्त केला.

मतदान केंद्रे

महाराष्ट्र विधान परिषदेच्या यवतमाळ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीसाठी जिल्ह्यात एकूण सात मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. त्यामध्ये यवतमाळ, वणी, केळापूर, राळेगाव, दारव्हा, पुसद आणि उमरखेड येथील तहसील कार्यालयांमध्ये मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे.

योगासन अजिंक्यपद स्पर्धा

येत्या ४ ते ८ जून दरम्यान अहमदाबाद इथं आयोजित पहिल्या जागतिक योगासन अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी होण्यासाठी अमेरिकेतल्या योगपटूंचं पथक भारतात येत

आहे. ‘युनायटेड स्टेट्स योग असोसिएशन’ आणि ‘वर्ल्ड योगासन’ यांच्या सहयोगानं, युनायटेड स्टेट्स योगासन स्पोर्ट्स फेडरेशननं  या स्पर्धेसाठी अमेरिकेच्या अधिकृत पथकाची घोषणा केली आहे. या कार्यक्रमामुळे ६०  पेक्षा जास्त देशांचे खेळाडू, आणि प्रतिनिधी एकत्र येणार आहेत.

बॅडमिंटन

इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी.व्ही सिंधूने दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. थायलंडच्या बुसानान ओंबांरुंहफानला तिनं आज २५-२३,२१-१६ असं पराभूत केलं. मालविका बनसोडला मात्र पहिल्याच फेरीत थायलंडच्या पोर्नपावी चोचुवांग कडून पराभव पत्करावा लागला. पुरुषांच्या गटात किदंबी श्रीकांतही पहिल्याच फेरीत पराभूत झाला.

हवामान

विदर्भातील अमरावती जिल्हयात आज विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा आणि अत्यंत हलक्या पर्जन्यवृष्टीचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर उर्वरित सर्व जिल्हयांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.  यादरम्यान अकोला, यवतमाळ या जिल्हयांमध्ये ताशी 50 ते 60 किलोमीटर वेगाने सोसाट्याचा वारा देखील वाहू शकतो.  येत्या 6 जून पर्यंत कमी अधिक प्रमाणात विदर्भात वादळी पर्जन्यमान राहू शकतं असा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाने व्यक्त केला आहे. दरम्यान सततच्या वादळी पर्जन्यमानामुळे कमाल तापमानात घट झाली असून मागील 24 तासात विदर्भाच्या सर्वच जिल्हयांमध्ये तापमान 40 ते 42 अंश सेल्सिअस दरम्यान राहिलं.

वादळ पाऊस

अमरावती जिल्हयातील मेळघाट परिसरात काल रात्री झालेल्या जोरदार वादळी पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. वादळी वाऱ्याने वीजतारा तुटून आणि खांब वाकल्याने धारणी उपकेंद्राअंतर्गत १५० हून अधिक गावांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. कुसुमकोट-भोकरबर्डी महामार्गावर अनेक झाडे कोसळल्याने वाहतूक काही काळ ठप्प झाली होती.

****